

# नदीखालची मेट्रो

मिठी नदीखालून मुंबई मेट्रोचं काम केलं गेलं.

## गोष्ट मेट्रोची

**सुनीत भावे**

आता लवकरच पावसाळा सुरू होईल आणि जोराचा पाऊस झाला, की पुण्यातील नदीत कधीकधी खूप पाणी येतं. नदीवरच्या पुलावरून हे जोरात वाहणारं पाणी पाहिलं आहेत की नाही? हे पाणी पाहताना, मध्येच थोडासा पाऊस झेलत मक्याचं कणीस खायला मज्जा येते की नाही.

नदी ओलांडण्यासाठी हे पूल वाहनांना उपयोगी असतात आणि पायी चालणाऱ्यांनाही. मग, जमिनीखालून जाणाऱ्या मेट्रोत नदीचं पाणी शिरत नाही का? मित्रांनो, या प्रश्नाचं उत्तर 'नाही' असंच आहे.

मुंबईत मिठी नदीखाली, कोलकात्यात हुगळी नदीखाली आणि पुण्यात मुठा नदीखाली मेट्रोसाठी बोगदा तयार करून नदीखालून मेट्रो धावण्याचा प्रयोग यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला आहे. एखाद्या नदीचा प्रवाह किती खोल असतो? तर तो फार तर जमिनीपासून १२ ते १६ मीटर खोल असतो, असं म्हणतात. म्हणजे साधारणतः जमिनीखाली तीन मजली इमारतीएवढा. त्याखाली पूर्ण कठीण दगडच असतो. याच दगडातून मेट्रोसाठी बोगदा तयार केला जात असल्यानं नदीचं पाणी या बोगद्यात कधी येत नाही.

एखाद्या नदीत खूपच पाणी असेल किंवा पावसाळ्यात पाणी वाढलं, तरी ते कोणत्याही बाजूनं बोगद्यापर्यंत येऊ नये, यासाठी बोगदा करतानाच, बारीकसारीक सर्व फटी बुजवल्या जातात. फक्त या नदीखाली बांधलेल्या मेट्रोतून जाताना पुलावरून दिसणाऱ्या पाण्यासारखं आपल्याला पाणी पाहता येत नाही.